# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १७–२०१०/ दिनांक :

सौ. सायक्का श्रीशैंल्य कल्याणी,
मु.पो. कोत्येंन बोबलाद, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौं. सायक्का श्रीशैंल्य कल्याणी, मु.पो. कोत्येंन बोबलाद,,ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे गट क्र. ९८ मध्ये ३ एच.पी.चा शेतीपंप विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. ८.१२.२००९ ला अर्ज केला व त्यासाठी आवश्यक ती फी रु. ५०/–पोष्टाच्या मनीऑर्डरने पाठविली.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने अर्जदाराचा अर्ज प्राप्त झालेपासून १ महिन्याचे आंत वि.प.ने चलन देणे गरजेचे आहे परंतु तशी कृती वि.प.ने केली नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ८.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ११२५४ दि. १६.१२.२००९ नुसार कृती मानके साध्य करण्यात वितरण कंपनीला अपयश आल्यास ग्राहकास भरपाई देणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

प्रस्तुतची तक्रार दिनांक ११.२.२०१० रोजी दाखल केली आहे. अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळेपर्यंत झालेल्या विलंबाबाबत कृती मानकानुसार भरपाई मिळावी अशी तक्रारदाराने मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वि.प.ने दि. ३.३.२०१० पर्यंत आपला लेखी अहवाल न देता तो दि. ७.४.२०१० च्या सुनावणीवेळी हजर केला. दि. २३.३.२०१० ला तक्रारीची सुनावणी ठेवली असता, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मार्च अखेर असलेने विशेष बील वसुली मोहिमेमुळे मुदत वाढवून मागितली व त्यांचे विनंतीवरुन सदर तक्रारीची सुनावणी दि. ७.४.२०१० रोजी ठेवण्यात आली. वि.प.ने आपल्या ७.४.२०१० च्या लेखी अहवालात, तक्रारदाराचा अर्ज ८.१२.२००९ रोजी प्राप्त झाला व दि. १३.१.२०१० ला चलन देण्यात आले असे म्हटले आहे. प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ७.४.२०१० रोजी सुनावणीस घेतली असता, प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. अे.के.कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग हजर. तक्रारदार प्रतिनिधीनी असे प्रतिपादन केले की, दि.८.१२.२००९ च्या अर्जास त्यांस ८.१.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते, ते दिले नाही त्यामुळे विलंब झाला आहे. वि.प.तर्फे तक्रारदार यांस दि. १३.१.२०१० रोजी चलन दिल्याचे प्रतिपादन केले, परंतु तक्रारदार यांनी चलनाचे पैंसे भरले नाहीत. १ पोलचे काम आहे असे सांगितले, परंतु ५ दिवसांचे विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. तक्रारदारातर्फे चलन बजावयाच्या पध्दतीला आक्षेप घेतला. कदाचित त्यास अनुसरुन श्री. शंकर मारुती सावंत त्रयस्थ गृहस्थ त्या गावचे रहिवाशी असून त्यांनी दि. ८.४.२०१० चे मंचाकडे अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये वायरमन श्री. मुजावर यांनी सौं. कल्याणी यांना देण्यासाठी चलनाचे पत्र त्यांच्याकडे दिले नसल्याचे सांगितले.

उभयबाजूंचे लेखी व तोंडी कथनानुसार तक्रारदार यांनी दि. ८.१२.२००९ ला शेतीपंप कनेक्शन मिळणेसाठी अर्ज केला व आवश्यक ती फी पोष्टाच्या मनीऑर्डरने पाठविली. एक बाब स्पष्ट होते की, कृती मानकातील तरतुदीनुसार ३० दिवसांचे मुदतीत चलन देण्यात आलेले नाही. त्यामुळे विलंबापोटी भरपाई देण्यास वितरण कंपनी जबाबदार आहे व तक्रारदाराचा तो हक्क आहे. दि. १३.१.२०१० रोजी चलन दिल्याचे ग्राह्य धरल्यास ५ दिवसांचा म्हणजे १ आठवड्याचा विलंब झाला आहे, त्यामुळे तक्रारदार हा रु. १००/– भरपाई मिळण्यास हक्कदार आहे व वितरण कंपनीची ती देण्याची जबाबदारी आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे. कृती मानकातील तरतुदीप्रमाणे प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे दि. ८.१.२०१० ते १३.१.२०१० या ५ दिवसाच्या म्हणजे १ आठवड्याच्या विलंबापोटी रु. १००/– भरपाई तक्रारदारास द्यावी.

२) सदर रकमेचे बिलात समायोजन करण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ३.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :